

# आठवणींची भरता शाळा

किरण भावसार

साहित्य प्रतिष्ठान

आठवणींची भरता शाळा

वर्ग रिकामा मनास छळतो

पुस्तकाचे नांव: आठवणींची भरता शाळा

प्रकार : ललित भावबंध

लेखक : किरण भावसार, सिन्नर, जि. नाशिक.
7588833562
kiran@enzymeindia.com

मुखपृष्ठ : अमृता ढगे, अंबरनाथ, जि ठाणे

मुखपृष्ठ व मलपृष्ठ चित्र : सुधीर बर्वे, लंडन

आतली कथाचित्रे : राहुल पगारे

अंतर्गत सजावट :Last Bench Design , मुंबई

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

*e Sahity Pratishthan®*
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*
*Ph : 9869674820*

*esahity@gmail.com*
*www.esahity.com*
*www.ednyaneshwari.com*
*http://etyarth.blogspot.in/*
*http://esahityapratishthan.blogspot.in/*
*www.marathiriyasat.com*

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे  पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

अर्पण पत्रिका

मनात आठवणींची शाळा भरवणाऱ्या

सर्व शाळकरी मित्र व शिक्षकांस

तसेच माझ्या शाळेस

हा संग्रह

कृतज्ञतापुर्वक समर्पित

किरण भावसार

प्रास्ताविक : किरण लोखंडे

१ संस्काराचं बोट

२ जपलेलं अन् जाणलेलं मोल चार आण्याचं!

३ कवीचं हृदय अन् फायटर फिश !

४ मामाचा सोफा

५ गीताई

६ दु:खाच्या अंगोपांगी भिनलेली इंदूआत्या!

७ आठवणींची भरता शाळा

आठवणींची भरता शाळा

चला जादू करू या...

मलपृष्ठ

अस्सल मातीच्या गंधात विरघळलेल्या

## हळव्या मनाची गोष्ट!

.. पोटासाठी पाय धावत राहतात. ललाट रेषांमध्ये रूतून बसलेल्या प्राक्तनाची कोडी सोडवित आपण देशांतरा निघतो. ते तर अटळच! माणूस म्हणून उभं राहताना अन् जगताना मनावर ज्या संस्काराचं, संस्करणाचं लेपण झालेलं असतं ते कधी खरडून बघितले, तर आपल्याला दिसतात ती, आपल्या पुर्वायुष्यातील हव्याशा- नकोश्या स्मरणांची चित्रं! या स्मरणचित्रांचे कोलाज मग आपल्या चारीदिशा व्यापून राहते..

किरण भावसार यांनी आपल्या आजवरच्या आयुष्यातील अशाच स्मरणांचे एक सकस आणि अर्थातच मनोवेधक चित्रण आपल्या 'आठवणींची भरता शाळा' या कथासंग्रहात अत्यंत संवेदनशीलपणे रेखाटले आहे. सिन्नर तालुक्यातील वडांगळी या गावाच्या मातीत रांगत आणि त्याच मातीत रंगून जात भावसार यांनी आपल्या आयुष्याला आकार दिला आहे, आपला एक वेगळा पोत घडविला आहे! जीवन प्रवासात काळजावर ज्यांनी गाव वसवलं आहे त्यांचे अप्रुप आणि त्यांच्याबद्दल इतरांना सांगण्याची गोष्टीवेल्हाळता यातून भावसार यांचा कथासंग्रह सिद्ध झाल्याचे जाणवते. शब्दांच्या जंजाळात न अडकता जे मनात आहे ते जसे आहे तसे पानापानात उमटविताना भावसार अगदी सहजपणे वाचकांना आपल्या कथांमध्ये गुंतून ठेवतात हे त्यांचे स्वतंत्र वैशिष्टय ठरावे. हाताच्या मुठीतून घरंगळून गेलेल्या आयुष्यासाठी आपल्या काळजातला एक कप्पा सदोदित हिरवा ठेवण्याची वृत्ती साऱ्यांमध्येच असते. हा कप्पा कधी कधी इतरांच्या अनुभवांनी ताजा होत असतो. भावसार यांचे अनुभवविश्व इतके सहज आणि सुंदर आहे की, त्यांच्या गोष्टींच्या गावात जाताना आपण आणि भावसार यांच्यात द्वैत म्हणून वेगळे असे काही राहत नाही! या अद्वैताचा अनुभव घेत आपण आपल्याही न कळत वडांगळीला जाऊन पोहोचतो.

..जीवनव्यवहाराशी जोडल्याचे यथार्थ समाधान बाळगून गावाचा चेहरा बनलेल्या जीवन शिक्षण शाळेपासून भावसार यांची अनुभव यात्रा प्रारंभ होते. दगडी पाटीवर गिरवलेली धुळाक्षरे, करडय़ा स्वभावाच्या देशमुख बाई, हळवे देशमुख गुरूजी, जिवाशी जोडले गेलेले मैत्र यांच्या आठवांची एक स्मरणमाळ भावसार यांनी अत्यंत तरलतेने गुंफली आहे.

बालपणाच्या ओल्या मातीवर उमटलेल्या संस्कारांच्या खुणा आयुष्यभर आपल्या सोबतीला असतात. आपल्या आईनं केलेल्या संस्कारांचे बोट धरूनच वाटचाल केल्याचा सार्थ अभिमान बाळगणारे

भावसार याबाबतचा अनुभव प्रत्ययकारी कथन करतात. लग्नाच्या पंक्तीतून तांब्यात भरून आणलेला शिरा म्हणजे अन्नाची चोरीच! या प्रकारामुळं रागावलेली ताई (म्हणजे लेखकाच्या मातोश्री) आणि मावशी. मावशीनं आपल्या मुलाला शिक्षा करताना उलथनीचा (उचटणी) दिलेला चटका अन् ताईच्या नुसत्या डोळयातील ठिणग्यांनी अंतरात्म्याला बसलेला दाह आपल्यालाही जाणवल्यावाचून राहत नाही!

भावसार यांच्या एकूणच लेखनप्रपंचात त्यांच्या मातोश्रींचे स्थान पानोपानी उमटलेले आहे. त्यातून प्रेमळ, मनमिळाऊ, प्रतिकुल परिस्थितीचा बाऊ न करता त्यावर मात करणारी करारी ताई भावसार रेखाटतात तेव्हा ताई केवळ त्यांची एकटय़ाची माय न राहता आभाळाची आई होते! हेच भावसार यांच्या लेखनाचे यश. त्यामुळेच मग आपण या अनुभव विश्वात आपल्या बालपणीची सय चाचपडत राहतो.

खिशात चार आणेदेखील नसल्यामुळे मध्यवर्ती बसस्थानक ते सातपूर अशी पायपीट आणि तीदेखील मध्यरात्रीच्या सुमारास अगदी एकटय़ाने! असा वेगळा अनुभव मांडताना भावसार त्यांच्या आर्थिक दुर्बलतेविषयी अगदी सहजतेने कोणताही खोटा अभिनवेश न आणता सांगतात. अर्थात त्यामुळेच हे स्मरण त्यांच्याविषयीची कणव निर्माण न करता भावसार यांच्या मनोवेदनेशी आपले नाते सांगून जाते.

इंदूआत्या, गीताई. मामाचा सोफा अशा अन्य कथांमधूनही भावसार आपल्याशी हितगुज साधतात. मुदलात भावसार यांचा स्वभाव गोष्टीवेल्हाळ आहे. जे भोगले आहे, अनुभवले आहे त्याचे भांडवल न करता ते अगदी सहज, सोप्या, सरळ शब्दात एकामागोमाग एक रीळ उलगडत जावा तद्वत भावसार सांगत जातात. अर्थात त्यामुळेच आपण त्यांच्या शब्दविश्वात गुंतून जातो आणि मग पानापानात दडलेले त्यांचे गाव, निसर्ग, माणसे जिवंत होऊन आपल्याशीही बोलतात..

खरे सांगायचे तर अस्सल मातीच्या गंधात विरघळून गेलेल्या हळव्या मनाच्या या गोष्टी आहेत. त्या वाचकांना निश्चितच भावतील असा विश्वास वाटतो. भावसार यांच्या भावी लेखन प्रपंचास मनःपूत शुभेच्छा!

**किरण लोखंडे, नाशिक**

(लेखक , पत्रकार)

# संस्काराचं बोट

मी पहिलीत वगैरे असेल. तो आणीबाणीचा काळ होता. सक्तीच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांचं सत्र जोरात सुरु होतं. आमच्या गावातही शिबीर लागलं. घरोघर झाडाझडती घेऊन पुरुष मंडळींची नसबंदी होत होती. आमच्या नानांचाही नंबर त्यात लागला.

घरात नाना एकटेच कमावते. हातावरचं पोट. शिलाई मशिनची चाकं जेवढी जोरात फिरत तेवढा पैसा घरात येई. टाच्या-टिभ्यावरचा प्रपंच. एव्हाना ताईदेखील थोडंफार शिवणकाम शिकून नानांना मदत करीत असे. कुणाच्या ध्यानी मनी नसतांना अचानक हे ऑपरेशन बळजबरीनं घरात घुसल्यानं नानांना किमान आठ पंधरा दिवसाची तरी विश्रांती घेणं भाग होतं. घरातला कर्ता माणूस अंथरुणावर पडल्यानंतर पोटापाण्याचा मोठाच प्रश्न उभा राहिला. तशात मालेगावची शकुंतला मावशी आपल्या अनिल अन् कैलास या दोन चिमुरडय़ांना घेऊन आमच्याकडे महिना पंधरा दिवस शिवणकाम शिकायला आलेली.

ताई या काळात नेटाने उभी राहिली. नाना कपडे कापून देत अन् ताई शिवत असे. तिच्या शिवणकाम शिकण्याचा कुटुंबाला फायदा झाला. उपासमार टळली. याच काळात मी शाळेत जाऊ लागलेलो. मावशीचा मोठा मुलगाही साधारण माझ्याच वयाचा. एखाद्या वर्षाने मोठा. तो आणि मी दोघे बरोबरच शाळेत जात असू. त्याची शाळा बुडू नये म्हणून माझ्यासोबत मावशी त्यालाही पाठवी. शाळेला डबा-खाऊ असे लाड तेव्हा नव्हते. गोड-धोडही सणावारालाच खायला मिळे. वरण-भातही क्वचितच! रोजची भाजी-भाकरी पोटभर मिळणंही चंगळ वाटावी अशी सगळी परिस्थिती.

अशात गावात एखादं लग्न, दहावा, हरिनाम सप्ताह असला म्हणजे आख्ख्या गावाला गावजेवण असायचं. आमंत्रण असो नसो बहुतेक सारं गाव तुटून पडायचं. गुळाची लापशी आणि कढीभात असा साधारणतः बेत असायचा. नुकताच ‘साखरशिरा’ या जेवणात येऊ लागला होता. कुठे ‘साखरशिऱ्याचं’ जेवण आहे असं समजलं तर आजूबाजूच्या खेडय़ातले लोक मोठय़ा आवडीने तिकडे धाव घेत असत. बुंदीचं जेवण फक्त श्रीमंतांच्या कार्यात अन् क्वचितच! अनेकदा वाढीव अंदाज ठेवूनच कार्याचा धनी स्वयंपाकाचं नियोजन करीत असे.

पत्रावळी फक्त पाहुणे मंडळींसाठी, वऱ्हाडासाठी असत. गावच्या मंडळींनी घरुनच ताट-तांब्या घेऊन जेवायला यावे अशा जाहीर सुचना लग्नाच्या लाऊडस्पीकरमधून दिल्या जात. पहिल्या पंगतीचा मान अर्थातच पाहुणे मंडळींचा असे. त्यांना पत्रावळया वाढल्या जात. त्यानंतर गावची ताट-तांब्याची पंगत भाताचं भलं मोठं 'आळं' करुन त्यात कढी वाढून घेतली जायची. सोबत शिरा किंवा लापशी. मंडळी कढीचे भूरके मारीत शिऱ्याचा आस्वाद घ्यायची. यात बऱ्याचदा भाताचं 'आळं' तसंच राहून जाई. कढी जास्तच चवदार झाली तर कढीची कढई लवकरच तळ गाठायला लागायची. भाताच्या पाटय़ा तशाच पडून राहत. 'रावजी बाबा'सारखा गावातला कर्ताधर्ता कारभारी माणूस कार्यावाल्याची होणारी पंचाईत अन् स्वयंपाकाचा अंदाज घेऊन पंगतीत शिरायचा. 'चला मंडळी आळे मोडा' असं आवाहन कम आदेश देत रावजीबाबाची स्वारी आली की लोक आवरतं घेत अनेकजण ताटात जास्तीचं वाढून घेत अन् कधीकधी तांब्यात शिरा घालून घरी घेऊन जात. पोरंसोरं तर हमखासच.

गावात कुणाचं तरी लग्न होतं. संध्याकाळचं, गोरज मुहूर्तावर. न्हाव्याने घरोघर फिरुन आवतनं दिलं होतं. नानांचं ऑपरेशन झाल्याने त्यांना काही यायला जमणार नव्हतं. शेजारी राहणाऱ्या सकूआत्याच्या घरात मात्र उत्साहाचं वातावरण होतं. आत्याची दोन्ही मुलं, त्यांचे बाबा (आम्हीही आत्याच्या नवऱ्याला बाबाच म्हणत असू) लग्नाला जाणार होते. त्यांनी आम्हालाही हूरवून दिलं.

'किरण, संध्याकाळी ताट-तांब्या घेऊन तयार राह्यचं! आमच्या सोबत चल, तुझ्या मावशीच्या पोरालाही घे' बाबांनी आमच्यात हवा भरली, आम्हीही भावंडं हुरळून गेलो. मला आठवतं ते मी हजेरी लावलेलं पहिलंच लग्न असावं. कधी एकदाची संध्याकाळ होते याची वाट पाहू लागलो. दोघांनी ताट-तांब्या बाजूला काढून ठेवला होता. अगदी दुपारची जेवणं झाल्यापासूनच. दोघांसाठी एकच!

माझी ताई खूप स्वाभिमानी, एकवेळ उपाशी राहावं पण असा हपापलेपणा, खाण्यासाठी केलेला हावरटपणा तिला अजिबात खपायचा नाही. गरीब असलो तरी आपल्या पोरांना दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावं लागू नये म्हणून स्वतःच्या पोटाला पीळ देऊन ती आमचे लाड-कोड पुरवायची. मागितलं ते खाऊ घालायची. पण परिस्थितीमुळे अर्थातच या साऱ्यावर मर्यादा यायच्या. गरीबीतल्या या स्वाभिमानाबद्दल माझी मावशी ताईच्याही एक पाऊल पुढेच होती.

बाबा बरेचसे मिश्किल तसेच बेरकी. ताईच्या स्वभावाला आव्हान देण्यासाठी त्यांनी आम्हा पोरांना लाडीगोडी लावून लग्नाच्या मेजवानीसाठी तयार केलं. ताईची परवानगी मिळणं शक्यच नव्हतं.

आम्ही मग दिवसभर आजीचा पदर धरुन बसलो. 'प्रभा, जाऊ दे गं पोरांला, बिचारे दोन दिवसांपासून हुरावले नुसते' आजीचा आदेश निघाला. पण ताईचे वटारलेले डोळे सारखे नजरेसमोर येत होते. एकीकडे लग्नाची मेजवानी अन् दुसरीकडे ताईचा रुद्रावतार. 'गोड घाश्या अन् संसार नाश्या' असं आजी मला नेहमी चिडवायची तरी तिनं परवानगी मात्र दिली होती.

संध्याकाळी हातपाय तोंड धुवून, गंध पावडर करुन बाबांचं बोट धरुन लग्नाला निघालो. बाबांनी आम्हाला लावलेली फूस ताईच्या फार जिव्हारी लागली होती. आम्हाला लग्नातला शिरा खुणावत होता. ताई प्रचंड संतापली होती पण आजी अन् बाबांपुढे तिचा नाईलाज झाला. आयुष्यात पहिल्यांदा तिचं संस्काराचं बोट माझ्या हातून सुटलं.

लग्नात मोठी धमाल होती. नवरदेवाची मिरवणूक, नकली घोडय़ावर नाचणारा रायरंद, स्त्रीच्या वेशात अंगविक्षेप करीत नाचणारा श्रावण नाच्या. घासलेटच्या गॅसबत्त्या, टेंभे यांच्या प्रकाशात संबळ-पिपाणीच्या तालावर पवित्रा घेऊन थिरकणारी पावलं उजळून निघत होती. हातातला ताट-तांब्या सावरीत आम्ही मिरवणूकीत हरवून गेलो. लग्नाच्या मंडपातही डिझेल इंजिनच्या जनरेटरवर रोषणाई केलेली. टय़ूब लाईटचा झगमगीत प्रकाश पसरलेला. त्या उजेडातही आमच्या अंधारलेल्या घरातले ताईचे वटारलेले डोळे मला अधूनमधून आठवत होते. उद्या सडकून मार बसणार हे निश्चित होतं पण लग्नाचं जेवण डोळ्यासमोर सारखं तरळत होतं. झालं! मंगलाष्टकं आटोपली, 'वऱ्हाडी मंडळींनी जेवायला बसावं', गावच्या मंडळींनी पहिल्या पंगतीला बसू नये' अशा सूचना लाऊडस्पीकरवरुन दिल्या जात होत्या. त्या सूचनांकडे कानाडोळा करुन एका कोपऱ्यात बाबांसोबत आम्ही जेवायला बसलो. आदल्या दिवसापासून ज्या जेवणाची वाट पाहत होतो ते ताटात आल्यानंतर मात्र पहिल्या वाढीतच पोट टम्म भरलं. तरीही बाबांच्या सांगण्यावरुन आणखी एकदा शिरा वाढून घेतला. तेवढा खाणं तर शक्यच नव्हतं. बाबांनी तो तांब्यात भरुन घ्यायला सांगितलं. मावसभाऊ अनिल आणि मी एकाच ताटात जेवलो. तांब्यातलं पाणी पिऊन उरलेला शिरा तांब्यामध्ये कोंबला अन् घरी आलो. रात्री तांब्यावर ताट झाकून ठेवून आजीच्या कुशीतच झोपी गेलो. ताईकडे जाण्याची हिंमत झाली नाही.

सकाळी आंघोळ-पांघोळ आटोपून तयार झालो. ताई माझ्याशी बोलत नव्हती. घुश्श्यातच दिसत होती. मला तांब्यातल्या शिऱ्याची आठवण झाली. मधल्या घरात जाऊन मी तो शोधू लागलो तर मागच्या घरात अनिल एकटाच शिऱ्याचे बोकणे भरतांना दिसला. झालं! दोघांमध्ये भांडण जुंपलं. हाणामारी सुरु झाली.

घडलेला प्रकार मावशीला कळाला. पाहुण्याच्या दारात आपल्या पोरानं खाण्यासाठी केलेला हावरटपणा, मारामारी तिला सहन झाली नाही. तिने नकळत चुलीमध्ये उलथणी तापत ठेवली. आम्हाला काही कळायच्या आत तिने अनिलच्या हातावर तापल्या उलथणीचा चटका दिला. त्याने भोकांड पसरलं. मी हळूच तिथून सटकून आजीच्या कुशीत लपलो.

कालपासूनच आम्ही दोघे भाऊ या दोन बहिणींच्या मनाविरुध्द वागत होतो. भिकाऱ्यासारखं तांब्यात शिरा आणणं. आणला तर आणला त्यावरुन भांडणं म्हणजे अगदी कहरच! मावशीने संतापाला वाट मोकळी करुन दिली. आपल्या पोराला अद्दल घडवली. आता माझी पाळी होती. ताईच्या डोळयांच्या जागी केवळ दोन ठिणग्या दिसत होत्या, लालबुंद. खरंतर त्यांच्या चटक्यांनीच मी होरपळून निघालो होतो.

ईवलूशा पोराला चटका दिल्यानं माझी आजी संतापली होती. तिच्या तोंडाचा पट्टा सुरु झाला. मावशी अन् ताई दोघींना ती अधिकार वाणीनं शिव्या घालू लागली. मी तिच्या कुशीत सुरक्षित होतो.

‘किती वेळ आजीच्या आड लपशील? थांब! पाहतेच तुझ्याकडं’ अशा अर्विभावात ताई माझ्याकडे पाहत होती. तिची रागीट मुद्रा अन् वटारलेल्या डोळयांतील ठिणग्यांनी माझे काळीज भाजून निघत होते. मात्र आजीमुळे उलथणीच्या चटक्यांपासून मात्र वाचलो.

त्या दिवशी वाचलो खरा, पण काळजावर जो त्या तापल्या डागाचा चरचरणारा व्रण उमटला. ती जन्माची आठवण राहिली. तांब्याभर शिऱ्याच्या लालसेनं ताईचं संस्काराचं बोटं त्या नाकळत्या वयात सुटलं माझ्या हातून, पण पुढे जेव्हाही कधी मोहाचे क्षण आले आयुष्यात, तेव्हा त्या बोटाला मी गच्च पकडून ठेवलं. चांगल्या गोष्टींसाठी नेहमी प्रोत्साहन देणारी ताई आपल्या मुलांना वाईट वळणं लागू नयेत म्हणून त्या तापल्या उलथणीपेक्षाही जास्त निष्ठूर व्हायची. आजही कुठे तोल जाऊ लागला की तिच्या डोळयांतले निखारे मला दिसू लागतात. काळजावरचा व्रण अधिकच दुखरा होतो अन् तिचं संस्काराचं बोट मी अजूनच घट्ट पकडून धरतो.

गच्च गच्च!

# जपलेलं अन् जाणलेलं मोल चार आण्याचं!

चार आणे! अंगठा आणि तर्जनीमध्ये ते इवलेसं नाणं आम्हाला तेव्हा आकाशीच्या चांदोबाइतकं मोठ्ठं वाटायचं! खूप किंमत नसेलही कदाचित. पण खिशाचं छिद्र बुजवायला चार आणे कामाही यायचेत. त्याकाळची ही स्मरणकथा!

ही गोष्ट चार आण्याला तेव्हा बाजारात मोल होतं तेव्हांची, तशी अलीकडची! नाही म्हणायला बंदा रूपया बऱ्यापैकी बाळसं टिकवून होता. आजच्या इतका अवमूल्यनाने गांजलेला निश्चितच नव्हता. साहजिकच चवली पावलीला किंमत होती. मेथी, कोथिंबीरीची जुडी किमान चाराण्याच्या आवाक्यात होती. खिशात, गल्ल्यात.. कंडक्टरच्या थैलीत चाराण्याचं छोटंसं नाणं असायचं हमखास! त्याच्यावाचून कामंही अडायची. प्रवाशी कंडक्टरशी चार आण्यांसाठी हुज्जत घालायचे असा तो पंधरा वीस वर्षांपूर्वीचा काळ.

बेकारीचे मळभ सरुन नुकताच एका कंपनीत शिकाऊ म्हणून नोकरीला लागलो होतो. १९९४ चा जानेवारी-फेब्रुवारी महिना. नाशिकला सातपूर कॉलनीत सुधाकर निंबाळकर या जीवाभावाच्या मित्राच्या खोलीत तात्पुरता आश्रय घेतला. अंबड एमआयडीसी मधील थम्स्अप, लिम्का वगैरे शीतपेये बनवणाऱ्या कंपनीत सायकलवरुन सातपूर कॉलनीतून जा-ये करु लागलो. पगार अवघा साडे सहाशे. खोली भाडे, दोन वेळचे जेवण हा किमान खर्च भागवतानाही तारांबळ उडायची. बरं आता नोकरीला लागलेलो म्हणजे घरी पैसे मागण्याची सोय नाही.

आय. टी. आय. झाल्यानंतर एक वर्षभर विद्यावेतनावर एका मोठय़ा कंपनीत काम केलं, अॅप्रेंटीस म्हणून. नंतर नोकरीसाठी बराच आटापिटा करुनही यश येईना. शेवटी चंबुगबाळं गुंडाळून पुन्हा गाव गाठलं. दीड वर्षात बेकारीच्या झळांनी पार होरपळून निघालो. वडीलांच्या हाताखाली या काळात शिवणकाम करत होतो. पण ते त्यांच्या लेखी काम नव्हतं. ‘हा असाच शिवणकामात गुंतला तर नोकरीचा विचार करणार नाही अन् आयुष्यभर आपल्यासारखेच टाके घालीत बसावं लागेल’ असा वडिलांचा दृष्टीकोन. मी वैतागून नोकरी शोधावी यासाठी सतत जिव्हारी लागेल असं बोलणं त्यांनी सुरु ठेवलेलं.

गरजा कमी होत्या. अल्पसंतुष्ट होतो. दोन वेळचं भागेल एवढ्या पगाराची जरी नोकरी मिळाली तरी ती पत्करायची असं ठरवलेलं होतं. अचानक डिसेंबर १९९३ मध्ये नाशिकच्या बाजीराव आरखडे या मित्राचं पत्र आलं की, 'नाशिकला एका कंपनीत आपल्या ट्रेडची जागा रिकामी आहे. मुलाखत देऊन ये!' बस्स! पहिल्या जानेवारीला ड्यूटीवर हजर झालो. खेड्यातून नाशिकला नोकरीला जायचं म्हणजे राहण्या-खाण्यापासून सर्वच गैरसोय. या काळात सुधाकर निंबाळकरचा केवढा आधार वाटायचा. भावासारखा तो पाठीशी उभा ठाकलेला! तुटपुंज्या पगारातही समाधान होतं. नोकरी मिळाल्याचा आनंद कितीतरी मोठा होता.

खिशात पैसे नसायचेच! पहिला पगार झाला. महिन्याचा खर्च भागवताना कापरासारखे पैसे संपून गेले. पंधरा दिवसांतून एकदा घरी चक्कर मारण्यासाठी तीस-पस्तीस रुपये जवळ ठेवलेले. भाड्यापुरते. एकदा सुटीच्या दिवशी घरी जायला निघालो. कंपनीत नव्यानं झालेल्या मित्रानं सिन्नरची बांधीव चप्पल आणायला पन्नास रुपये दिले. 'येतांना आठवणीने घेऊन ये' सांगितलं. माझ्याकडं स्वतःचे भाड्यापूरतेच पैसे होते. सुटी संपवून परत येतांना घरुन पायलीभर बाजरीचं बाजकं, धुतलेले कपडे आणखी काही बाही अशी पिशवी घेऊन नाशिकला येण्यासाठी निघालो. सिन्नरच्या पूलावरच्या दुकानात मित्रासाठी चप्पल घेतली. त्याने पन्नास रुपये दिलेले. चप्पलची किंमत साठ रुपये. खूप घासाघीस केली. शेवटी गयावया करुन पंचावन्न रुपयांना चप्पल विकत घेतली.

चप्पल विकत घेतली खरी पण माझ्या गाडीभाड्याच्या बजेटला एकदम धक्का बसला. खिशात अगदी काठोकाठ सिन्नर ते नाशिक बसभाड्या इतकेच पैसे उरले. सिन्नरच्या बसस्टॅंडवर आलो. कोणी ओळखीचे दिसले तर एखादा रूपया उसना घेता येईल असा विचार मनात येत होता. एक-दोन ओळखीचे लोक भेटलेही पण त्यांच्याकडे पैसे मागण्याची हिम्मतच झाली नाही. (अशावेळी जीभ कमालीची जड होते असा माझा नेहमीचा अनुभव!)

बेकारीच्या या मधल्या काळात एक वर्षभर पत्रकारीता केली होती. पत्रकारीतेतून परिचित झालेले गावाकडचे एक सामाजिक कार्यकर्ते योगायोगानं बसस्टॅंडवर भेटले. 'चल चहा घेऊ' म्हणाले. खरं तर मला चहा नको होता. चहाचे पैसे उसने मिळाले असते तरी माझी नाशिक ते सातपूर प्रवासाची चिंता मिटणार होती. आम्ही चहा घेतला. ते गप्पा मारत होते. पण माझे त्यात अजिबात लक्ष नव्हते. मनाचा हिय्या करुन त्यांच्याकडं एखादा रुपया मागावा, असं सारखं वाटत होतं. पण हिम्मत झाली नाही. त्यांचा निरोप घेऊन नाशिकची बस पकडली. मनात एक गणित होतं. खिशात पावणे सात रुपये उरलेले.


नाशिकचं भाडं होतं पावणेसहा. एक रुपया उरणार होता. तेवढ्यात सी. बी. एस. ते दूध डेअरीपर्यंत एक स्टेजचं किमान अंतर तरी प्रवास करता येणार होता. बाकीचं अंतर जाऊ चालत असं ठरवलेलं. इथंही दुर्दैव आड आलं. ज्या बसमध्ये बसलो ती लांब पल्ल्याची निघाली. तिने सव्वा सहा रुपये भाडं घेतलं. आता खिशात उरले केवळ पन्नास नये पैसे!

सिटीबसच्या एका टप्प्याच्या अंतरासाठी कमीतकमी भाडं होतं बारा आणे अन् माझ्या खिशात उरले होते केवळ आठ आणे. चार आण्यांचा प्रश्न होता! माझ्यासारख्या भीडस्त मुखदुर्बळ माणसासाठी तर मोठाच बिकट! नाशिकला सीबीएसवर उतरलो. आता काय करायचं? सातपूर कॉलनीचं अंतर जवळपास साताठ किलोमीटरचं. स्वतःची फार कींव आली. डोळ्यात पाणी उभं राहिलं. जरासं इकडं तिकडं पाहून पायलीभर बाजरीचं बाचकं खांद्यावर घेतलं. एका काखेत पिशवी अडकवली अन् झपाझप सातपूर कॉलनीची वाट त्या रात्रीच्या अंधारात थंडीने काकडत चालू लागलो.



आता वाटतं त्यावेळी स्पेशल रिक्षा केली असती तर घरी जाऊन पैसे देता आले असते. पण खोलीवर जाऊनही काय देणार होतो? मेटाकुटीच्या त्या दिवसात केवळ चाराणे खिशात नसल्यानं ती वेडी पायपीट करावी लागली. आज इतिहासजमा झालेल्या त्या चाराण्यांनी माझ्या मनावर मात्र ऐतिहासिक खूण गोंदवून ठेवली आहे!

# फायटर फिश



# कविचं हृदय अन् फायटर फिश !



बऱ्याच दिवसांनी विवेककडे गेलो. कवीचंच घर! त्याच्याइतकंच संवेदनशील! अंगणातली झाडंही ओळखीची. वेळोवेळी शब्दांतून भेटणारी. घर भिंतीपासून माणसांपर्यंत सगळेच स्वागतातूर! एव्हाना चौकोनी कुटुंबाला अपूरं पडू लागलेलं हे घर छतावर पुन्हा नव्यानं विस्तारण्याची प्रक्रिया सुरू झालेली! घरावर मजला चढत असल्यानं अंगणात सतत सिमेंट - वाळू यांचा सडा.

अंगणातला ढीग उपसता उपसता दमछाक झालेली असतानाही सौ. वहिंनीनी सुहास्य स्वागत केलेलं. गप्पाष्टक रंगलं असताना अधून-मधून कविताच्या सरीही कोसळत होत्याच. अशा चिंब वातावरणात सहजच टी.व्ही. जवळ ठेवलेल्या फिशपॉटकडे लक्ष गेलं. आजवर बऱ्याच ठिकाणी रंगीबेरंगी मासे एकत्र विहरत असणारे फिशपॉट पाहिलेले परंतु येथे तर काचेच्या गोल हंडीत एकच मासा लहरताना दिसला.

‘अरे! एकच मासा?’ माशाच्या हंडीजवळ जात निरीक्षण करीत मी विचारले.


‘प्रसन्नाच्या मित्रानं त्याला भेट दिलाय!’ विवेकनं सांगितलं.

‘नाही पण त्यात आणखीही मासे ठेवायचेत ना! हा एकच मासा पाहायलाही कसंतरीच वाटतं!’ त्या एकटय़ा माशाच्या एकाकीपणाबद्दलची कणव व्यक्त करीत उद्गारलो.



‘याला फायटर फिश म्हणतात! एका भांडय़ात हा एकच मासा राहतो! दुसरा जोडीदार आला तर हा त्याच्याशी लढून त्याला मारुन टाकतो.’ विवेकनं या माशाच्या एकटेपणाचं कारण दिलं!

नंतर त्याच्याबद्दलची अधिक माहिती देण्यासाठी विवेकनं त्याचं खाद्यं वरतून त्या काचेच्या हंडीत टाकलं! हे महाशय अन्नाचा तो घासही एखाद्या बॉक्सरने ठोसा लावावा त्या अर्विभावात ओरबाडल्यासारखा नव्हे तर जिंकून घेतल्यासारखा मटकावत होते. त्याच्या त्या खाण्याच्या एकंदर पध्दतीवरुनच मला या माशाच्या स्वभावाची



कल्पना आली.

पाण्यातला मासा, झोप घेई कैसा।

जावे त्याच्या वंशा, तेव्हा कळे।।

- या संत वचनाची आठवण झाली. इथे वंशात तर सोडा परंतु पाण्यातही न जाता भगवंताच्या या प्रथमावताराचं स्वभाव दर्शन मला घडत होतं. पूर्वी दोन-चार वेळी मी मत्स्यप्रदर्शन पाहिलंय! अगदी तिकीट काढून! निरनिराळ्या आकारांचे छोटय़ापासून मोठय़ांपर्यंत रंगबेरंगी, चकाकणारे, चंदेरी, सोनेरी नाना प्रकारचे मासे. अनेक घरांचे दिवाणखाने, हॉटेल्स, दुकाने यातही हौसेने पाळलेले मासे पाहिलेत. परंतु या फायटर फिशने मात्र मला अस्वस्थ केले. माणसांशी दोस्ती करणारे डॉल्फीन, प्रचंड आकाराचे देवमासे, माणसाच्या जिभेचे चोचले पुरवणारे तसेच अनेक मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचे साधन असणाऱ्या या जलचरांबद्दल आजवर मी केवळ परिचित होतो. परंतु मानवी भावभावना, स्वभाव वैशिष्टय़े धारण करणाऱ्या फायटर फिशने मला विचार करायला भाग पाडले.

या युध्दखोर लढाऊ माशाशी आपला अधिक निकटचा परिचय आहे. आपल्या दैनंदिन जीवनात अशी व्यक्तिमत्वं आपल्याला सदैव भेटतात, आपल्या अवतीभवती वावरतात अशी जाणीव होऊ लागली. एकाकी, तुसडी माणसं आपलं सगळं आयुष्यच आपल्या स्वभावानं नासवतात. अर्थात, तसं इतरांना वाटतं! ती मात्र यातही आपणच जिंकलो अशा अविर्भावात असतात.

दुसऱ्याचं अस्तित्व सहन न होणं ही भावनाच खरंतर किती स्वार्थी! येन केन प्रकारे दुसऱ्याला संपवून स्वतः तगून राहणं, जीवघेण्या स्पर्धेत बिनदिक्कत इतरांचं आयुष्य संपवित स्वतःचं अधिराज्य निर्माण करणं. खरं तर या प्रवृत्ती राजकीय जीवनात अथवा पैशाचा, सत्तेचा अतिहव्यास बाळगणाऱ्या सरंजामी वृत्तीत दडलेल्या असतात. या वृत्तीच्या माणसांना हवं ते कदाचित मिळवताही येतं. मात्र इतरांच्या मुंडय़ा पिरगाळून मिळणाऱ्या सुखाला सुख म्हणता येईल?

कुरूक्षेत्रावर भगवंतानं अर्जुनाला गीता सांगतांना त्याला युध्दाला प्रवृत्त केलं, मात्र फायटर फिश प्रवृत्ती कौरवांमध्ये दडलेली होती. माणुसकी अन् स्वार्थातली लढाई अनेकदा स्वार्थाच्या बाजूने झुकलेली

दिसते. ही लढाई लढतांना बहुतांश सर्वसामान्य माणूस गलितगात्रच असतो. गीता ऐकणाऱ्या अर्जुनासोबत मला दुर्योधनातला हा लढावू मासा दिसू लागतो. अनेक घरांत माझं तेच खरं, हम करे सो कायदा या वृत्तीनं वागणारी माणसं इतरांच्या मनाचा विचार न करता अतिरेकी वृत्तीनं सत्ता गाजवत राहतात. त्यांना ती मिळतेही पण सुख, शांती, समाधान ती केव्हाच हरवून बसलेली असतात. भांडून, इतरांना नामोहरम करुन आक्रस्ताळेपणाने काम करणारेही काही काळ जिंकतात पण तेही खरे तर एकाकी फायटर फिशच!

अंतःकरणात माणुसकीचा झरा असणाऱ्या कवीच्या घरात या फायटर फिशनं मात्र स्वतःसाठी बऱ्यापैकी जागा करुन घेतली आहे. अगदी कवीच्या मनातही! कवीच्या मन अन् घराशी कमालीची विसंगत असणारी स्वभाव वैशिष्ट्ये असूनही विवेक त्याला आज जीवापाड जपतोय. एका मुक्या जीवाची काळजी घेतोय. कारण कवीच तो! अन् कवीकडं असतं ते केवळ आईचंच हृदय!



# मामाचा सोफा

पाच-सहा वर्षापुर्वी घर बांधलं. कुवतीपेक्षा जरासं मोठंच. 'घर पहावं बांधून' उक्तीचा पुरेपूर अनुभव घेतला. एकतर अंथरुण पाहून पाय पसरण्याचा स्वभाव! त्याला मुरड घालून अंथरुणाबाहेर थोडे फार पाय काढण्याचा प्रयत्न केल्यानं पुरेशी दमछाक झालेली. एरवी पगार होण्यापुर्वी महिन्याचा अर्थसंकल्प तयार असे. आता प्रत्येकवेळी घर खर्चाची पगाराशी तोंड मिळवणी करताना तोंडाला फेस यायचाच तेवढा बाकी राहू लागला. तशातही पगाराच्या दिवशी सगळा हिशोब नजरेसमोर असतानाही खर्चाला हात थोडा सैल सुटे अन् त्यानंतर पुढच्या पगाराची वाट पाहत, नाहक केलेल्या खर्चाबाबत स्वतःला दुषणे देत, एक एक दिवस ढकलावा लागे. महिनाअखेरीचे दिवस तर अक्षरशः परीक्षा पाहण्यासाठीच उगवत. याकाळात येणारे पाहुणे म्हणजे पांडवा घरी दुर्वास अवतरल्यासारखे भासत.

अशा अवस्थेत नवीन घरात नवीन वस्तू नवी भांडीकुंडी घेण्याचा प्रश्नच नव्हता. हळूहळू वर्षागणिक आर्थिक परवड कमी होत गेली पण घरात फर्निचर घेणं काही होत नव्हतं. इतरांचे सजलेले दिवाणखाने बघून मन खट्टू होई. आमचा दिवाणखाना नुसताच ओकाबोका वाटे. केवळ एक लोखंडी पलंग हॉलमध्ये बैठकीसाठी ठेवलेला. बाकी घर मोकळं. पोरांना हूंदडायला.. मनसोक्त.

गेल्या दिवाळीची गोष्ट!

थोडीशी आर्थिक जुळवा जुळव करुन घराला रंग द्यावा की थोडं फार फर्निचर विकत आणावं यावर आमचा नवरा बायकोचा विचार विनिमय सुरू झाला. सुरूवातीला दिलेल्या चुन्यानंतर अजून रंग देणं झालं नाही. मुलांनी सगळ्या भिंतींवर आपली चित्रकारी करुन ठेवलेली. कुठे 'ए बी सी डी' तर कुठे पाढे, कुठे बाराखडी तर कुठे चिऊ काऊ चितारलेले. ठिकठिकाणी भिंती तडकलेल्या. रंग देणं आवश्यक झालेलं, मात्र त्याचं बजेट आमच्या जमलेल्या पुंजीच्या आवाक्याबाहेर गेलेलं. अखेरीस रंग देण्याऐवजी फर्निचर घेण्याचा विचार पक्का झाला. हॉलमध्ये लाकडी सोफा, शोकेस, बेडरुममध्ये दिवाण, एक लोखंडी कपाट असं कमीतकमी किंमतीत, घासाघीस करुन इकोनॉमी क्लासचं फर्निचर घेऊन आलो.

फर्निचरची खरेदी म्हणजे मोठीच डोकेदुखी! लग्नाकार्यात देण्याच्या अहेरु वस्तूंपासून तर अत्यंत उच्चप्रतीच्या वस्तू पाहून डोकं गरगरू लागे. अनेक दुकाने फिरुनही पसंती होत नव्हती विशेषतः सोफासेट. रेक्झीनच्या कव्हरचा घ्यावा, कापडी कव्हरचा घ्यावा की पारंपरिक लाकडी बनावटीचा चौकोनी कुशन्सचा यावर बराच खल केला. सोनू- मोनू या दोन्ही चिरंजीवांच्या तोडफोडीच्या खोडीमुळे रेक्झीनचा सोफा घेण्याचा विचार आम्ही रद्द केला. खेळता खेळता रेक्झीन एकदा कुठे फाटले की सगळ्या सोफ्याचाच बोऱ्या वाजायचा. नवनवीन तऱ्हेचे अनेक सोफे आकर्षित करीत असतानाही त्यांचा मोह आम्ही टाळला. इतक्या दिवसांनी आमच्याकडून ह्या वस्तू घेणं होत होतं. पुढे लगेच त्या खराब होणं परवडणारं नव्हतं. खरंतर अशा वस्तू वारंवार घेणं होत नाही. म्हणूनच आम्ही लाकडी सोफा घेण्याचाच निर्णय पक्का केला.

- एकीकडे घरात नवा सोफा घेण्याची तयारी सुरू असतानाच आजवर काळजात दडवून ठेवलेली नकोशी आठवण मात्र सारखी जागी होत होती..

- मी सातवी आठवीत असेन. धाकटा भाऊ राजू आणि मी सूट्टीत मामाकडे शहाड-उल्हासनगरला गेलो होतो. चांगले महिनाभर राहिलो. त्याच काळात टी.व्ही., व्ही.डी.ओ. सर्वत्र आले होते. मामाची आर्थिक परिस्थिती गरीबीचीच. आपण जेव्हा गरीब असतो तेव्हा आपले सर्व नातेवाईकही साधारण त्याच परिस्थितीतले असतात. मामा मोटार गॅरेजवर वेल्डर म्हणून कामाला होते. त्यांची सर्व आमदनी गॅरेजचा मालक, त्याच्या धंद्याची तेजी मंदी यावर अवलंबून असायची. तरीही त्या परिस्थितीत आजी, मामा-मामी आमचं हवं नको पहात आम्हाला जीवापाड जपायचे. शक्य तितका लाड करण्याचा प्रयत्न करायचे.

मामाकडे एक सोफा होता. लोखंडी गजांच्या सांगाडय़ावर नायलॉनच्या वायरने विणलेला! याच धाग्यांची आकर्षक नक्षी असलेला. कुणा मित्राने दिलेला. त्याकाळी बहुतेक फोटो स्टुडिओत अशा प्रकारची छोटीशी विणलेली खूर्ची लहान मुलांचे वगैरे फोटो काढण्यासाठी हमखासच असायची. मामाची खोलीही छोटीशी. दहा-बाय-दहाची. भाड्याने घेतलेली. त्या खोलीत सगळ्यांना बसायलाही जागा पुरत नसे. हा सोफा बाहेरच भिंतीलगत ठेवलेला असे. आमचा बराच वेळ त्या सोफ्यावर खेळण्यातच जाई.

खेळता खेळता कधीतरी माझ्या हातून सोफ्याच्या नायलॉन दोरीचे दोन-तीन धागे कापले गेले. त्या वयात त्याचं विशेष असं काही वाटलं नाही. आजी तेवढय़ा पुरतं रागावली. 'हाता पायाला खोडी..'

वगैरे काही तरी म्हणाली. जावयाची मुलं म्हणून मारायची सोय नव्हती. दहावी पास झाल्यानंतर, बऱ्यापैकी समजदार वगैरे झाल्यानंतर एकदा कधीतरी मामाच्या घरी गेलो. मामाच्या खोलीबाहेर त्या सोफ्याचा केवळ सांगाडा गंजलेल्या अवस्थेत पडलेला होता. नायलॉनच्या उरल्या सुरल्या दोऱ्या त्याला लटकलेल्या होत्या. त्याच्या खालच्या बाजूच्या गजांवर फळया वगैरे टाकून तो कसाबसा बसण्यासाठी वापरत असावेत.

माझ्या अजाणतेपणी घडलेल्या चूकीमुळे तिथे पडलेले ते सोफ्याचे अवशेष बघून मी ओशाळलो. माझ्याकडून काही धागे तुटल्यानंतर एक एक करीत सगळे धागे निसटून तो सोफा जायबंदी झाला. माझी चूक मामाला चांगलीच महागात पडली. त्यांच्या ओढगस्तीच्या संसारात तो सोफा सांधणंही झालं नाही. नव्याने विणून घेण्याची गोष्ट तर दूरच! नंतर मामाने कामाच्या शोधात गाव बदललं, घर बदललं पण तो सोफा आजही सांगाडय़ाच्या रुपात मामाच्या घरात अडगळ म्हणून पडून राहिला आहे. कधी तरी विणून घेता येईल म्हणून!

आज मी कर्ता सवरता चांगला दोन मुलांचा बाप झालेलो. माझ्या बायकोला इतरांच्या मुलांचं सोडाच स्वतःच्या मुलांनीही घरातल्या वस्तूंची केलेली नासधूस अजिबात सहन होत नाही. लाकडी सोफ्याचा निर्णयही त्याचमुळे आम्ही घेतलेला. घरात फर्निचर घेतांना दहा वेळा विचार करणारा मी. त्याचं रेक्झीन फाटू नये, त्याची वाट लागू नये असा विचार करणारा. त्याच्यावर स्वच्छ आच्छादन घालून त्यावर मुलांना अजिबात उडय़ा मारू न देणारी बायको अन् आपल्या फाटलेल्या सोफ्याबाबत अवाक्षरही न बोलणारा माझा मामा..

- खरंच अजूनही मी मामाइतका मोठा झालेलो नाही..

# गीताई



# गीताई




आता वाटतं ते सारे आपल्या मनाचे खेळ होते. तिच्याशी आम्ही फार वाईट रितीने वागलो. समाजाकडून मिळालेली अवहेलना झेलीतच तिची अखेर झाली. मनात तिच्याबद्दल कणव होती, पण नाही देऊ शकलो तिची साथ. प्रवाहाविरुध्द पोहण्याची आमची छाती नव्हती.. अन् तिच्या प्रेमाला.. वात्सल्याला प्रतिसाद देण्याऐवजी आम्हीही निष्ठूरपणे तिचं मायाळू मन चुरगाळत राहिलो त्याची ही गोष्ट.

गीताई. तिचं नाव किती सुंदर. नंतर खुप कधीतरी विनोबांची गीताई हाती आली. या सुंदर नावाची ही बाई गावकऱ्यांच्या दृष्टीने चक्क बहिष्कृत होती. तिच्याभोवती, तिच्या घराभोवती एक गूढतेचं वलय लहानपणापासूनच मी पाहत आलेलो. ती एक जहाल भुताळीण असल्याचा आख्ख्या गावाचा समज. आम्ही प्राथमिक शाळेत असल्यापासून तिच्याबद्दलच्या भयकारी कहाण्या पोरासोरांपासून बायाबापडय़ांपर्यंत रंगवून रंगवून सांगितल्या जायच्या. तिच्या घरासमोरुन, त्या गल्लीने जाणे सुध्दा आम्हा मुलांसाठी मोठे दिव्यच असायचे.

मला आठवतं तेव्हाच तिचं वय साठी ओलांडून पुढे सरकलेलं असावं. पांढरेशुभ्र झालेले केस, कपाळावर भलंमोठं कुंकू, धारदार नाक, समोरच्याला जरब बसावी अशी तीक्ष्ण नजर, गोरापान रंग व आवाजात असलेला किंचित चिरकेपणा व कंप यामुळे आम्हा मुलांना ती फारच भितीदायक वाटत असे. बालकथांमधील चेटकीण बहुधा अशीच असावी असं तिच्याकडे पाहून वाटायचं. गावातल्या त्या घरात तिचा म्हातारा नवरा अन् ती असे दोघेच राहत.

नवऱ्याच्या नोकरीनिमित्त त्यांचं बरंचसं आयुष्य नाशकात गेलेलं. निवृत्तीनंतर नवरा बायको आपल्या गावातल्या घरी परतलेले. शेतीकडे लक्ष देता येईल या विचाराने. त्यांचा मुलगा वगैरे नाशकातच नोकरीनिमित्त राहत होता. बाकी या कुटूंबाबद्दल काही माहिती नाही. कुणी कधी ती जाणून घेण्याचाही प्रयत्न केला नाही. कुणाशी तितकी जवळीक निर्माणच झाली नाही.



तिचं दिसणं खरं तर तिला आडवं आलं. नऊवारी काष्टी पातळ



नेसून,केस मोकळे सोडून पहाटेच देवदर्शनाला जाणं, पुजेअर्चेत रममाण होणं. कदाचित नाशिकच्या धार्मिक वातावरणाचा हा संस्कार असावा. पण खेडय़ापाडय़ात मात्र या चांगल्याचं वांगलं व्हावं तसं झालं. गावानं तऱ्हेवाईक नजरेने तिच्याकडे पाहायला सुरुवात केली. सुरुवातीला ती गल्लीत आजूबाजूला कुणात मिसळली नाही. नवखेपणामुळे. लहानमुलं तिला घाबरत. तिच्या डोळयांच्या धाकाने काही मुलं तापही काढत. झालं! तिच्याबद्दलच्या अफवांना ऊत आला. एकतर्फी. तिला 'बाहेरचं' येतं, मग तिच्या घराकडे फिरकायलाही बायाबापडय़ांना भिती वाटू लागली. आज तिने कुणाच्या गायीचं दूध उडवलं. कुणावर करणी केली. आजूबाजूच्या भगत-मांत्रिकांचाही धंदा ती आल्यामुळे वाढला. आडपडद्याने ते तिचंच नाव कुणालाही गंडा-तोडा देताना घेऊ लागले. कुणाला गल्लीत विंचू चावला तरी तो विव्हळण्याचं नाव घेईना. तिच्या दहशतीनं. ती म्हणे विंचू चढवायची. कुणाला पान लागलं.. सर्पदंश झाला तरीही तिचंच नाव. गाव असं सारखं संशयानं बघू लागलं. उतारवयात आपल्या हक्काच्या गावात रहायला आलेलं हे म्हातारं जोडपं तिरस्करणीय ठरु लागलं.

अशी वाटय़ाला आलेली हेटाळणी त्यांच्या दृष्टीने अनाकलनीय होती. रस्त्याने जाताना लोकं तोंड फिरवायची. बायाबापडय़ा घाबरुन आपल्या लेकरांना पदराआड झाकायच्या. कुठं स्वतःहून कुणाकडं कामानिमित्त गेलं तरी 'आली ब्याद' असाच भाव समोरच्याच्या चेहऱ्यावर उमटायचा.

ती माणूसच होती. गल्लीत आजूबाजूला, शेजारी-पाजाऱ्यांना तिनं आपलंसं करण्याचा प्रयत्न केला पण ती माणसं न भांडता दुरावत गेली. गावात एखादी बाई घुमू लागली की तिला 'बाहेरचं झालं', भुताळीण लागली' असं समजत. सगळे, विशेषतः त्या स्त्रीच्या घरचे, गीताईच्या नावानं दात ओठ खात. बोटं मोडीत.





गीताई प्रेमाची भुकेली होती. ती कुणाशी घरोबा निर्माण करु पाही. प्रेमाने जवळ जाऊ पाही अन् मन मोडून घेण्याचा निराश अनुभव तिच्या पदरात पडे. कुणी जरा गोड बोललं की तिला किती बरं वाटे ती जवळीक निर्माण करु पाही. पण पुढे समोरुन कडवटपणा ठरलेला.

आमच्या घराबाबतही तेच झालं. काही शिवणाटिपणाच्या निमित्ताने ती आमच्या घरी आली. आम्ही शाळकरी मुलं होतो. तिच्याबद्दल एकेक ऐकलेलं. आम्ही टरकलोच! माझी आई-ताई खुप समंजस. तिनं म्हातारीचं मन समजून घेतलं. तिचं दुःख तिला कळालं. म्हातारीला तिनं चहा पाजला. ताईचं माहेर म्हणजे आमचं आजोळ नाशिकचं अन् गीताईचं उभं आयुष्यही नाशकात गेलेलं. दोघींच्या तारा जुळल्या. धार्मिक विषयांवर पंचवटी, रामकुंड, कुंभमेळे अशा अनेक गप्पा आठवणी निघाल्या. ताई तिचं भुताळपण विसरुन गेली. आपल्या आईचं रुपच तिला तिच्यात दिसू लागलं. खरंतर ताई पुर्वीपासूनच अशा गोष्टींवर फारसा विश्वास ठेवीत नसे. तेवढय़ापूरतं तेवढं इतर बायकांच्या गप्पांत त्यांच्या हो मध्ये 'हो' मिसळत असे इतकंच!



गीताई आता वारंवार आमच्या घरी येऊ लागली. तास-तास, दोन-दोन तास थांबू लागली. तिच्याकडची भाजीची वाटी चार गल्ल्या ओलांडून आमच्याकडे येऊ लागली. सुरुवातीला आम्ही कुणी त्या भाजीला बोटसुध्दा लावत नसू. ताईच्या म्हणण्यावरुन हळूहळू खाऊ लागलो. आमच्या वडलांना (नानांना) मात्र तिचं घरी येणं अजिबात

पसंत नव्हतं. शाळेत मुलं चिडवत असल्यानं आम्हा मुलांनाही नव्हतं. ती घरी आली की आम्ही अभ्यास सोडून खेळायला बाहेर पडत व कंटाळून तिच्या जाण्याची वाट बघत घराबाहेर ताटकळत थांबत असू.

हळू हळू आमच्या गल्लीतही कुजबूज सुरु झाली. शेजारणी-पाजारणी ताईला समजाऊ लागल्या.

'अगं, जगाच्या तोंडाला हात लावता येतो का?' उद्या म्हणतील गीताई हिला भुताळपण शिकवायला येती म्हणून... कशाला थारा देती तिला पालथीला.. आता आली का सरळ खसकावून टाक.. पुन्हा पायरी चढू नको म्हणा.. पाह्य बाई.... लेकराबाळांचं घर तुझं. उगाच कीव करायला जाशील अन् तुझाच जीव जायचा'


गल्लीतल्या बायांनी ताईला परिस्थितीची जाणीव करुन दिली. काही अंशी तिला ते पटलंही. विनाकारण गीताईच्या संगतीनं होणारी बदनामी परवडणारी नव्हती.

आता गीताई दूरुन कुठूनही येतांना दिसली तरी ताई घराला कडी अथवा कुलूप घालून कुठेतरी आडबाजूला घरात जाऊन बसू लागली. आपलं थकलेलं शरीर सावरत लेकीच्या ओढीनं भेटायला जावं तशी ती ताईकडे येत असे. तिला अशा रितीने चकवणं, तिचं भाबडं मन मोडणं ताईलाही कितीतरी दिवस जड गेलं. पण काळजावर दगड ठेवून तिनं लोकलज्जेपायी ते सहन केलं. प्रवाहाविरुध्द पोहण्याची आमच्या कुटूंबाची हिंमत झाली नाही. गीताईचं हेही घर तुटलं.

म्हातारपणात आणखी हेळसांड वाढली अन् शरीर थकलं तसं दोघे म्हातारा म्हातारी मुलाकडे नाशिकला गेली अन् गावाने सुस्कारा टाकला. आज हे सगळं आठवतांना मला स्वतःचीच कीव येते. अपराधीपणाची जाणीव होते. माझ्या अशिक्षित आईला जे कळलं ते आमच्या अज्ञान-अंधश्रध्देने आम्हाला कळू दिलं नाही. एक भोळा भाबडा जीव आम्ही अवहेलनेने होरपळून टाकला. आज आम्ही नाक वर करुन समाजातल्या अंधश्रध्देवर बोलतो, टीका टिपण्णी करतो तेव्हा मनातल्या गीताईची सल आतून मात्र काळीज कुरतडत असते.



# इंदूआत्या



# दुःखाच्या अंगोपांगी भिनलेली इंदू आत्या!

घर शोधीत आलेल्या दुःखाला तिनं वाऱ्यावर नाही सोडलं! त्याचे भरुन आलेले डोळे पुसले. त्याला कुशीत घेतलं. तेही बेटं तिचं आख्खं आयुष्य व्यापून राहिलं... मरस्तोवर! तिनंही आपलं उभं आयुष्य त्याच्या नावावर लिहून दिलं. न हारता. धीरगंभीरपणे! ती गेली तेव्हा त्या दुःखाला ओक्साबोक्शी रडतांना पाहिलं मी..

आमच्याच आळीच्या पाठभिंतीला राह्यची ती. इंदूआत्या. गावात मला तीन आत्या. वडीलांची बहीण सखुआत्या. वाण्याची सरजुआत्या अन् तिसरी इंदूआत्या. लग्नानंतर काही दिवस सासरी राहून पुन्हा नवऱ्यासोबत आपलं कुटूंब घेऊन माहेरी राहायला आलेल्या.

माझी सख्खी सखुआत्या एक घर सोडून पलीकडे राहते. प्रेमळ तितकीच भांडखोरही. सख्खे बहिणभाऊ असूनही अनेकदा आमचे नाना आणि तिच्यात खटके उडत. मग वर्षानुवर्ष अबोला. मात्र आम्हा मुलांना तिच्याकडून मिळणाऱ्या मायेत अंतर पडलं नाही.

सरजूआत्या गल्लीतच राहते. तिला आम्ही 'भोजी' म्हणतो अन् तिच्या नवऱ्याला 'फुफाजी' म्हणत असू. फुफाजी असतांना त्यांचं 'किर्तांगळीला' किराणा मालाचं दुकान होतं. तिचा भाचा निलेश आमच्यात भावंडासारखा वाढला. लहानपणी आई वारल्यानंतर त्याला या आत्यानेच पोरासारखं वाढवलं. आमच्याही वाटय़ाला तिचं तितकंच प्रेम आलं. परिस्थितीशी लढत जगावं कसं हे या तिन्ही आत्यांकडून शिकावं.

माझी आई-ताई... तिनं आपल्या लाघवी अन् मनमिळावू स्वभावानं या तिन्ही आत्यांना जिंकलेलं. कुणाचं मन न मोडण्याचा, न दुखावण्याचा तिचा स्वभाव त्यामुळे सगळ्यांना आपलंसं करण्यात ती पटाईत. नाना कधीकधी या बहिणींशी फटकळपणे तिरसटपणानेही वागत पण ताई हे दुरावे सांधण्याचं काम करी.

- इंदूआत्याच्या वेदनांच्या धाग्यांचे स्मरण माझ्या या लेखावर उमटले आहे!



मला आठवतं तसं तिच्या कपाळावर कुंकू नव्हतंच. दुःखानं दिलेली ती पहिली सलामी. नवऱ्यानंतर लहानग्या लेकराला धुणीभांडी, मोलमजुरी करीत तिनं वाढवलं. ही आत्या जात्याच सुगरण. तिच्या हाताला अमृताची गोडी होती. लहानशा गावातही तिची खानावळ प्रसिध्द होती. परगावचे सरकारी अधिकारी, नोकरदार, एकेकटे राहणारे शाळा मास्तर यांची जेवणाची चांगली सोय होई. मंडळी बोटे चाटीत राहत. साध्याशा स्वयंपाकातही ती आपला प्राण ओतीत असे.

ज्यांच्याकडे ती काम करीत असे, त्यांच्या घरातलंच एक माणूस बनून. त्यांची मुलं सांभाळणं, घरातील पडतील ती कामं आवरणं, दुखणी-बहाणी पहाणं. अशी कितीतरी कुटूंबांवर तिनं मायेची पाखर धरलेली. मात्र आपला पोच तिनं कधी सुटू दिला नाही. ती कधी दीनवाणी झाली नाही की कुठे लाळघोटेपणा केला नाही. कुणी प्रेमाने, मानाने काही दिलं तर तिनं घ्यावं. अन्यथा घरात पाणी पिऊन झोपावं अशी करारी. दुःखाला तिच्याशी झोंबाझोंबी खेळायला त्यामुळे मजा वाटायची.

तिच्या कष्टाळू, सेवाभावी, मायाळू स्वभावाला पुढे कधीतरी दवाखान्यातल्या दायीच्या कामाची जोड मिळाली. अन् पन्नासभर रुपडय़ांसाठी आरोग्य केंद्रात मदतनीस म्हणून राबायला सुरुवात झाली. कुठंतरी उजाडेल, कधीतरी पगार वाढेल म्हणताना पन्नास रुपये महिन्यावारी वर्षानुवर्ष ती लसीकरण, बाळंतपण, कुटूंबकल्याण शिबीरं अशी धावाधाव करीत राहिली. पैशाची सततची ओढाताण, कामाची धावपळ, यांत एकुलत्या एक पोराच्या शिक्षणाचं मातेरं झालं. अर्धवट शाळा शिकून पोरगंही मोलमजुरी करु लागलं.

कनातीच्या सिनेमासाठी खड्डे खोदतांना कधीतरी आपणही असा कनातीचा सिनेमा सुरु करु अशी जिद्द पोरानं मनात बांधली. उपाशी-तापाशी राबून एक दिवस स्वतःचं प्रोजेक्टर मशिन घेऊन आला. हळूहळू पैसा जमवत कनात शिवली. बांबू बल्ह्या विकत घेतल्या. आत्याला सुखाचे दिवस दिसू लागले. दुःखाने हात पाय गोळा करुन घेतले.

आत्याची धावपळ आणखीच वाढली. पोराला मदत करायला. त्याच्या कामाच्या रगाडय़ात त्याला सिनेमाचे रिळ नाशिकहून आणून दे, काम झालेल्या पेटय़ा पुन्हा पोचव अशी कामंही ती तिची रोजची धावपळ सोसून करु लागली. तिचे सगळे नातलग-गणगोत सुस्थितीत. हिचीच आबाळ झालेली. त्यामुळे सगळयांनी पाठ फिरवलेली. आता हिच्या घरात पैसा खेळू लागला. पोरगा कमावता झाला म्हटल्यावर भावाने आपली पोरगी सुन म्हणून देण्याची तयारी दाखवली. मोठा भाऊ श्रीमंत. आपल्या घरात पोरगी देतो म्हणतांना ही हरखून गेली. आपल्याला नाही तर आपल्या लेकराला तरी आधार होईल म्हणून ती आनंदानं राजी झाली, अन् दुःख पुन्हा ताजतवानं होऊन तिच्या घरात वावरु लागलं.

वर्ष दोन वर्ष नांदून सुनेनं नवऱ्याला सोबत घेऊन माहेरची वाट धरली. कनातीच्या सिनेमाच्या धंद्यातला भरही आता ओसरला होता. पोरगा स्वतःची प्रवाशी जीप घेऊन स्वतः चालवू लागला. तिकडेच सासुरवाडीला स्वतःचं घर बांधलं. पोटच्या गोळयाशी काय दुरावा धरायचा म्हणून सगळे अपमान गिळीत ती मुलाकडं रहायला गेली. 'आपलं जगात कोण ह्ये दुसरं. तिथंच मिळंल ते खाऊन राहू, स्वतःच्या नातवंडांना खेळवू' म्हणत गेली. आता आत्याच्या प्रेमाला मुकणार म्हणून आम्ही कासावीस.

गेली खरी पण दुःखाचं भलं मोठं गाठोडं घेऊन चार-सहा महिन्यांतच परत आली. कायमची. घरभर झालेलं दुःख कोरडे झालेले डोळे. आत्या पुन्हा कामाला लागली. जगाचा संसार सावरु लागली. रक्ताच्या नात्यांतील जिव्हाळे आटल्यानंतर जोडलेल्या नात्यांतील उब ती शोधू लागली. आमच्यासारखी भाचरं, आमची शाळेतली हुशारी, आम्हाला मिळालेली बक्षीसं, आमच्या नोकऱ्या, लग्नं या सगळयांत तिला कोण आनंद! आपलं स्वतःचं समजून आमचं कौतुक ती इथं तिथं सांगत राहायची. हे केवळ आमच्याच बाबतीत नव्हे तर तिच्या प्रेमाने बांधलेल्या सगळयाच कुटूंबांसाठी तिची हिच तऱ्हा. गावातून बदलून गेलेले नोकरदार खास तिला भेटायला येत अन् त्यांच्याकडच्या घरच्या मंगल कार्यासाठी मूळ लावून घरातलं माणूस म्हणून तिला घेऊनही जात.



दुःखानं पुन्हा डाव साधला. आपला फणाच काढला. सुड उगवल्यासारखा. तिच्या एकुलत्या एक लेकराचा अपघाती मृत्यू झाला. आख्खं गाव गहिवरलं. उरला सुरला आधार गेला. आभाळाचा खांब निखळावा तसा.. आभाळच कोसळलं. पैशांमुळं जवळ आलेल्या नातलगांनी रंग दाखवले.

सख्खा भाऊ वैऱ्यासारखं वागला. तिच्याजवळ होतं नव्हतं ते ओरबाडून आपल्या विधवा झालेल्या मुलीच्या नावावर करुन भावानंही डाव साधला. पोटच्या गोळयाला गमावण्याबरोबरच पोटापाण्याचाही प्रश्न आ वासून उभा राहिला. एकाकी अनाथपण रेटीत अन् मानलेल्या नात्यात आधार शोधीत ती जगत राहिली.

वृध्दापकाळ पेन्शन योजनेसाठी सरकार दरबारी तिनं शेकडो खेटा घातल्या. इथंही भाऊच आडवा आला. निराधार योजनेची पेन्शन बहिणीला मिळाली तर आपली बदनामी होईल म्हणून आपलं वजन वापरुन त्यानं ती मंजूर होऊ दिली नाही. दुःखानं असा चारी बाजूंनी हल्ला चढवलेला!

याही अवस्थेत कधी वाकडी वाट करुन तिच्या घरी तिला भेटायला गेलं तर तिला किती आनंद होई. काय करु अन् काय नको. घरात काही असलं तर हमखास हातावर ठेवी. चहा करण्याची लगबग सुरु होई. शब्दाशब्दातून मायेचा, प्रेमाचा अखंड वर्षाव सुरु. मी गाव सोडून सिन्नरला रहायला आलो अन् तिच्या या प्रेमाला अंतरलो.

'किरण एकदा मला तुझ्या घरी यायचंय, चांगलं चार आठ दिवस राह्यचंय' असं ती म्हणत राह्यली नेहमी. शेवटी शेवटी तिला आजारानं ग्रासलं. अंथरुणाला खिळली. माझ्या घरी येणं राहूनच गेलं. मीही कितीतरी स्वप्नं रंगवली होती तिच्या स्वागताची.. पण गेले द्यायचे राहून.. अशी सगळी अवस्था! तिच्या मायेच्या ऋणाची मी नाही करु शकलो परतफेड. असं कुणी कुणी केलेल्या प्रेमाचं ओझं घेऊनच जगतो आहे. कधी फिटेल कुणास ठाऊक.



ती मरणोन्मुख असतांना तिच्या नातलगांना फोन केला. भाऊ म्हटला 'आता आधीमधी आजिबात कळवू नका थेट मेल्यावरच सांगा, मग तयारीनेच येऊ' अखेर ती गेली. दुःखाचे सगळे प्रहार झेलीत. आयुष्यभर पुरुन उरलेले दुःखही मग ओक्साबोक्सी रडलं. अगदी आमच्या गळयात पडून!



# आठवणीची भरता शाळा



# आठवणींची भरता शाळा

विठूरायाच्या शिरावर रत्नजडीत मुकूट शोभावा तशी गावाच्या शिरोभागी डौलदारपणे विराजमान झालेली मराठी शाळेची प्रशस्त कौलारु इमारत माझ्या मनात नेहमीच ‘आठवणींची शाळा’ भरवत राहिली आहे. बालवयातल्या रम्य भावविश्वाला तिने सदोदित जागवले आहे. गावाच्या उत्तरेला दीड-दोन एकराच्या विस्तीर्ण पटांगणावर सुमारे दीडशे वर्षापेक्षा अधिक्‌ काळापासून उभ्या असलेल्या या ज्ञानमंदिराचं नावही.. ‘ज़ीवन शिक्षण विद्यामंदिर’ असं जीवनाशी जोडलेलं!

गावाच्या दर्शनी भागात गावाचा चेहरा बनून राहिलेली ही शाळा. १८५७ च्या उठावानंतर आठच वर्षानी या शाळेची येथे स्थापना झालेली. तीन खोल्यांची इंग्रज काळातली टुमदार इमारत आजही बाळगोपाळांना तितक्याच आस्थेने ज्ञानामृत पाजत आहे. सिन्नरहून येतांना खोपडी व पिंप्री रस्त्याच्या चौफुलीपासून हाकेच्या अंतरावर ही इमारत सर्वप्रथम आपले लक्ष वेधून घेते. मेंढीकडे जाणारा रस्ता शाळेला तसेच गावाला वळसा घालून पुढे सरकतो. फर्लांगभर अंतरावर असलेलं सतीआईचं देऊळ आजूबाजूला सर्वत्र खळयांचा वेढा पडलेला. शेतात राबणाऱ्या हातांनी उभारलेलं हे ज्ञानाचं मंदिर या सगळया पार्श्वभूमीवर ठसठशीतपणे उठून दिसणारं. चिखलातल्या कमळासारखं!

आख्या पंचक्रोशीला शिकवणाऱ्या शाळेच्या तीन खोल्यांची इमारत अपुरी पडे तेव्हा गावातल्या देवळांत, गढीतल्या महानूभाव वाडय़ात शाळेचे वर्ग भरत. विद्यार्थ्यांची ही परवड जाणून गावातील समाजधूरीणांनी लोकवर्गणीतून बाजूलाच सागवानी लाकडात भव्य अशी पाच खोल्यांची कौलारु इमारत साकारली. गुरुवर्य मामासाहेब दांडेकरांचा स्पर्श लाभलेली, त्यांनी उद्‌घाटन केलेली ही इमारत. तिथे आम्ही शिकलो हे आमचं केवढं भाग्य!

आमच्या लहानपणी बालवाडी असे, अंगणवाडी तशी नंतरची. पण या बालवाडीतही फारसा कधी मी रमलो नाही. तिथे खाऊ मिळे पण त्याचा मोहही त्या वयात पडला नाही. मी थेट पोहोचलो तो पहिलीतच अन् तेही भलं मोठं पटांगण, कडूलिंबाच्या झाडांच्या दाट सावलीतल्या या मराठी शाळेत.

अजूनही ठळक आठवतं.. खापराची पाटी घेऊन एका काशिद्याच्या पिशवीत घरातलं कसलंसं पुस्तक घेऊन मी सुरुवातीच्या दिवसांत शाळेत जात होतो. पाटीही माझ्या आतेबहिणीची मंदाताईची

वापरलेली असावी. शाळेचं वळण लागावं म्हणून ज़ात होतो. पहिलीचा स्वतंत्र वर्ग अजून सुरु व्हायचा होता. आम्ही दुसरीच्याच वर्गात जाऊन बसत होतो. तिथे देशमुख गुरुजी शिकवायचे.. मोठे गोड.. छान छान गोष्टी सांगायचे.. जादूच्या, राक्षसाच्या.. श्रावण बाळाची गोष्ट डोळयांत पाणी आणायची. गुरुजीही हलकेच डोळे पुसायचे. असा गोष्टींनी शाळेचा लळा लावलेला. पहिलीचा वर्ग अजून सुरु न झालेला. उंचेपुरे धोतर, टोपी, तीन बटनांचा फिटकप शर्ट घातलेले धिप्पाड देशमुख गुरुजी त्यांचं प्रेमळ शिकवणं इतकं अंगवळणी पडलं की आता दुसरा वर्गच नको असं वाटू लागलेलं.

एक दिवस देशमुखबाई वर्गात आल्या. पहिलीच्या मुलांनी उठून उभे रहा म्हणाल्या. देशमुख बाई आणि गुरुजी आमच्याच गल्लीत रहायचे. बाई करडय़ा शिस्तीच्या, दिसायलाही करारी. देशमुख गुरुजींच्या वर्गातून दुसरीकडे जाण्याची इच्छा होत नव्हती. पहिलीचा असूनही मी उठून उभा राहिलो नाही. बाईंनी स्वतः कान पिरगाळून उभं केलं. सर्व पहिलीची मुलं एकत्र करुन उंच ओटय़ावर पहिल्या खोलीत आमचा वर्ग भरु लागला. 'वाट्याकाठय़ां'पासून आमचं शिकणं सुरु झालं.

माझ्या उजव्या हाताला सहा बोटं असल्यानं मी पेन्सिल डाव्या हातात धरुन गिरवायचो. डाव्या हाताने गिरवतांना दिसलो की बाई त्यावर छडीचा फटका मारत व उजव्या हातात पेन्सिल देऊन हाताला धरुन गिरवित. बाई थोडं पुढे गेल्या की नक़ळत पेन्सिल पुन्हा डाव्या हातात येई. शेवटी बाईंनी नाद सोडला अन् मी डावखूरा झालो.

आतापर्यंत घर गल्ली एवढंच असलेलं माझं विश्व विस्तारलं. संपूर्ण गावातून, निरनिराळया घरांतून गल्ल्यांतून आलेली मुलं रोज भेटू लागली.. प्रत्येकजण मित्र झाला.. खेळ रंगू लागले. एका लयीत पाढे पाठ होऊ लागले. रोजचा परिपाठ वाचन... सकाळची शाळा मधली सुटी पुन्हा दुपारची शाळा. शाळेनं वेड लावलं. कधी कधी रविवारच्या दिवशीही सकाळी सकाळी लवकर आवरुन मी शाळेत जाण्यासाठी दप्तर घेऊन निघायचो. कधी घरचे तर कधी गल्लीतले माझ्यावर हसत. मी हिरमुसला होऊन परत फिरे. दर पंधरा दिवसांनी आम्ही चिमूरडी पोरं शेण गोळा करुन आणून देत असू अन् वर्गातल्या मुली आपल्या कोवळया हातांनी वर्ग सारवत असत.

करडय़ा शिस्तीच्या देशमुखबाईंनी फाजील लाड केले नाहीत. अनेकदा कान पिरगाळले पण धडे पक्के होत गेले. गोष्टीवेल्हाळ देशमुख गुरुजी हवे हवेसे वाटत राहिले... साने गुरुजीच जसे!

इथेच अनेक मित्र भेटले. जीवा भावाचे. नोकरी करणाऱ्या आईवडिलांसोबत अनेक़ज़ण मधूनच शाळा, गाव सोडून ग़ेले. मनात मात्र कायमचं घर करुन! सुहास मंडलीक, सुभाष वाघ, सुभाष शिंदे.. असे किती तरी. इयत्ता तिसरीत नवनाथ आला. चांगुलपणाचं मोठं भांडवल घेऊन. प्रतिकूलतेशी चार हात करतांनाही वर्गाचं नेतृत्व करणारा. तो आपला मित्र असावा असं वर्गातल्या सर्वांना वाटायचं. पुढे अपयश पदरी येऊनही आपल्या दिलदारपणाने त्याने सर्वांना ज़िंकलेलं. कुणाची बदली होऊन एखादा मित्र दूरावण्याची वेळ त्या कोवळ्या वयातही वेदनादायी ... डोळ्यांत आसवं उभी करणारी ठरे.

राजू खुळे सारखा एकमेव मित्र अगदी पहिलीपासून एम. ए. पर्यंत सोबत राहिला. मध्यंतरी दहावीनंतर मी आय. टी. आय. ला गेलो तर एक वर्षाकरीता का होईना तोही आय. टी. आय. ला फिरकून ग़ेला. आवड म्हणून मी पत्रकारीता सुरु केली अन् त्याने व्यवसाय म्हणूनच वृत्तपत्र क्षेत्र निवडलं. सविता कदम सारखी सुंदर सुस्वभावी निरागस वर्गभगीनी लग्नानंतर दोन चिमुरड्या मुलांना उघड्यावर टाकून हकनाक बळी गेली. ही घटना आम्हा प्रत्येकालाच चटका देणारी ठरली. आमच्या वर्गात फुललेल्या चाफ्याचं क्षणार्धात निर्माल्य झालं!

पांडू बकरेची पुस्तकं वाचूनच दहावीपर्यंतचा माझा अभ्यास होत राहिला. त्याची निख़ळ मैत्री विसरणं अशक्यच! इयत्ता पाचवीपासून ग़ावोगावचे अनेक मित्र येऊन मिळाले. आजूबाज़ूच्या खेड्यांवरुन पायी कुणी सायकलवर पाचेक़ किलोमीटरचं अंतर तुडवीत येणारे! कोमलवाडीचा रावसाहेब टेमगर पुण्याला चांगला उद्योजक झाला. श्याम खुळे, दत्ता खुळेसारखे मित्र स्वक़र्तृत्वावर परदेशात स्थिरावले. गोरख चव्हाणके, सोमनाथ खुळे सारख्या मित्रांनी सैन्यात जाऊन ऑपरेशन विज़यसारख्या मोहिमांत मर्दुमकी गाजवली अन् शांतीसेनेसोबत परदेशातही आपला ठसा उमटवला. दिपक खुळे, दत्तू खुळे सारखे मित्र उच्च शिक्षणासाठी सोबत होते. दिपकने तर प्रत्येक चांगल्या कामात मनापासून साथ दिली. प्रसंग़ी कठोर टिका तर वाचनालयाच्या उभारणीसारख्या कामात झोकून देऊन पाठबळ दिलं.

आता परवा परवा दिपक आमच्या मराठी शाळेच्या शालेय समितीचा अध्यक्ष झाला अन् त्याच्या धडपडीला नवं क्षेत्र मिळालं. जिथं आम्ही फळयावर वाट्याकाठ्या - बाराखडी शिकलो तिथं त्यानं संगणकाच्या माध्यमातून ई-लर्निंग सुरु केलं. फळयांच्या बाजूला कॉम्प्युटरचे स्क़ीन झळकू लागले. माझ्या शाळेतली मुलं संगणकाद्वारे शिक्षण घेऊ लागली.

शाळेनं कात टाकलेली. खरं तर आमच्या वर्गातली आम्ही मुलं आयुष्यात फार काही असं भव्य दिव्य नाही करु शकलो. कुणी डॉक्टर, वकील, इंजिनीअरही झालो नाही. पण चांगली माणसं मात्र नक्कीच झालोत. परिस्थितीशी झगडत आपापल्या नोकरी व्यवसायात स्थिरावत शाळेने दिलेले मित्र.. आज एकमेकांपासून दूर असलो तरी.. ही मैत्री जीवापाड जपत आहोत. शाळेशी ऋणानुबंध आहेतच. आईचं अन् शाळेचं नातं वेगळं असतं का?



# आठवणींची भरता शाळा

आठवणींची भरता शाळा
वर्ग रिकामा मनास छळतो
रूप लेवूनी सावित्रीचे
बाईंचा चेहरा तरळतो

खडूफळ्याची सोबत आणिक
दप्तर विटके, फुटकी पाटी
बालपणीचे सरले वैभव
सोनसयींची मनात दाटी

पायही होते अनवाणी अन्
गणवेषाची कुठे झळाळी
परी ज्ञानाची खरी खुमारी
वास्तुतुनी या अम्हा कळाली

बालभारती पुस्तक केवळ
पुस्तक नव्हते अमुच्यासाठी
शब्दफुलांची नक्षी रेखीत
मनात रुजली मायमराठी.

नव्हती जरी गणिताशी गट्टी

छडीने पाढे पाठ करवले

वीण मैत्रीची घट्ट जोडुनी

सवंगडी परी दूर हरवले.

शेणाने सारवल्या भुईवर

अंथरण्या जरी नव्हते बस्कर

शिवबापरी त्या सांगत गोष्टी

जोजविले तुम्ही अमुचे अंतर

वाट्या काट्या बाराखडीतून

गेलो अक्षर अक्षर गिरवत

मैत्र जीवाचे होऊन अवघी

हीच अक्षरे आली सोबत

जपला, जपतो मनी निरंतर

शाळेचा हा लळा जिव्हाळा

हुरहुर परी दाटते अंतरी

आठवणींची भरता शाळा


-----किरण भावसार (7588833562)

# चला जादू करू या !

किरण भावसार या नव्या लेखकाचे काळजाला हात घालणारे लिखाण वाचकांना आवडते. म्हणून त्यांचे हे दुसरे पुस्तक आज आपल्यासमोर आणतो आहोत. ई साहित्य प्रतिष्ठानचे हे स्टेज अशा नव्या दमाच्या लेखकांसाठी आहे. हे पुस्तक कसे वाटले ते कळवा. जर हे पुस्तक तुम्हाला आवडले असेल तर तसे कळवा म्हणजे त्यांचे पुढले पुस्तक, “शनीखालची चिंच” तुम्हाला पाठवू.

ई साहित्य नेहमी नवनवीन लेखकांचे लिखाण घेऊन येत असते. नुकत्याच ई साहित्य प्रतिष्ठानच्या www.esahity.com या वेबसाईटला तीन लाख हिट्स पूर्ण झाल्या तर www.ednyaneshwari.com या वेबसाईटला पन्नास हजार. इतर सर्व वेबसाईट्स मिळून जवळ जवळ पाच लाख हिट्स. ई साहित्यचे दिडलाख ई मेल सभासदही पूर्ण होत आहेत.


हल्लीची पिढी “वाचत नाही, वाचत नाही” असं बरेच लोक म्हणत असतात. काही प्रमाणात हे खरंही आहे. काही प्रमाणात असं म्हणायचं कारण म्हणजे आताच्या पिढीतही काही वाचस्पती मंडळी आहेतच अणि त्यांचं वाचन तोंडात बोटं घालायला लावेल इतकं व्यापक आणि सखोल आहे. पण वाचनाला दोन गोष्टी लागतात. आवड आणि सवड. त्यातल्या दुसऱ्या गोष्टीची या पिढीकडे मारामार आहे. निवांतपणा असा नाहीच. स्पर्धा, धावाधाव, मनाची घालमेल यातून ही पिढी जाते आहे. आणि त्यांना चांगल्या विचारांची, स्थैर्याची, आणि पुस्तकांची गरज आहे. कॉम्प्युटरच्या या जमान्यात ई पुस्तकांद्वारे ही गरज भागवली जाऊ शकते.




मराठीत असे ई साहित्य निर्माण करणाऱ्या अनेक संस्था आणि व्यक्ती आहेत. आणि त्यांना खुप चांगला प्रतिसाद मिळत असतो. त्यांपैकीच एक आम्ही ई साहित्य प्रतिष्ठान.

गेल्या बारा महिन्यांत ई साहित्य प्रतिष्ठानने प्रसिद्ध केलेल्या ई पुस्तकांची आणि नियतकालिकांची यादीच पहा.

**बालभारती** : संग्राहक : सुरेश शिरोडकर : गेल्या सत्तर ऐंशी वर्षांतील बालभारती पुस्तकातील ४०० कवितांचा संग्रह



**लालनाक्या** : प्राजक्त देशमुख : एका विदूषकाची कहाणी

**संगीत कानसेन** : शास्त्रीय संगीताच्या विविध अंगांची ओळख करून देणाऱ्या सहा पुस्तिकांची मालिका : संकलन : सुनिल सामंत

**दुर्ग दुर्घट भारी** : महाराष्ट्रातील शिवकालीन किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिका : संपादक : नचिकेत जोशी : रायरेश्वर आणि केंजळगड, किल्ले पुरंदर, खादेरी उंदेरी जलदुर्ग, माहुली गड ( लेखक : माधुरी नाईक, अरविंद नाईक)



**बालनेटाक्षरी** : संपादिका : अनघा हिरे : बालसाहित्याचा खजिना : बालगाणी विशेषांक, बालदिन विशेषांक, बाल गोष्टी विशेषांक, विज्ञान विशेषांक, रंगबिरंगी





**नेटाक्षरी** : संपादक : शशिकांत रणवरे, सचिन काकडे, सोनाली घाटपांडे, भारती सरमळकर : कवितांचे संग्रह : सहज सुचलं म्हणून, मी कात टाकली, पालवी, बीज अंकुरे अंकुरे, सावल्यांची पावले, move on, स्त्री, पाणी, क्षितिजाच्या पार, चेकमेट, मैत्रबन, ग्रेस आदरांजली हे गेल्या बारा महिन्यांतील काही अंकांचे विषय आहेत.


**स्वरनेटाक्षरी** : संपादक : शशांक नवलकर. स्वर : शिरीन शिकलगार : बोलक्या पुस्तकांची आयडिया : तो आणि ती.

**अक्षर अंकुर** काव्य स्पर्धा : संयोजन आणि संपादन : संहिता हिस्वनकर , रंजन कंधारकर: मार्गदर्शन : कवी फ मुं शिंदे. दोनशेहून अधिक नवकवींचा प्रतिसाद. ८९ कवींच्या कवितांची निवड करून पाच काव्यसंग्रहांची निर्मिती

**विक्रमादित्य** : निर्मिती : सुनिल सामंत: सचिन तेंडुलकर यांच्या शतकांचे शतक साजरे करणारी विशेष पुस्तिका.

**महाकैवल्यतेजा** : लेखिका वैशाली कुलकर्णी: निर्मिती : अमृता ढगे : संत ज्ञानेश्वरांचे जीवन आणि कार्याची महत्ता सांगणारे एक छोटेखानी पुस्तक






**वाटा आणि वळणे** : प्रवास वर्णने : महेंद्र कुलकर्णी : एक अनोखा प्रवास, भारतातील असे काही अप्रसिद्ध स्पॉट्स जे जगात अद्वितीय आहेत.

**राजहंस एकला** : कथा काव्य : कविता मोकाशी

**उनाड** : संपादक : आनंद माने: नव्या पिढीला उत्साह देणाऱ्या लेख, चरित्र आणि निबंधांचा संग्रह

**रोबो** : सैन्यजीवनावरील लघुकादंबरी : लेखक दिनानाथ मनोहर : ही कादंबरी आता मुंबई विद्यापिठाने MA च्या अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहे.


**चुकत कोण नाही?** : बालगोष्टींचा संग्रह : लेखिका कुमुदिनी बल्लाळ

**ज्ञानेश्वरी** : श्री विजय पांढरे लिखित ज्ञानेश्वरीचे ओविबद्ध रुपांतर. जिथे जिथे मराठी माणूस तिथे तिथे ज्ञानेश्वरी पोहोचवण्याचा संकल्प. आजवर सुमारे १२ लाख लोकांपर्यंत ज्ञानेश्वरी लिखित वा ऑडिओ स्वरूपात पोहोचली आहे.

**शंभूराजे** : दामोदर मगदूम. एका वादळी व्यक्तीमत्त्वाची कहाणी आणि स्वतः शंभूराजांनी लिहीलेल्या कवितांचा संग्रह.

**पक्ष्यांना रंग कसे मिळाले ?** : बाल लघुकादंबरी : लेखिका अनघा हिरे

**चित्रशक्ती** : संपादक : राहुल अरुणा किशन रणसुभे : चित्रांद्वारे सामाजिक समस्यांना वाचा फोडण्याचे व समाजबदल घडवण्याचे एक सुंदर तंत्र.







**खोड** : The green Horror: किरण कुलकर्णी : मराठीतील भयकथांचा नवा अध्याय

**यह तो श्री की इच्छा** : लेखक : सुनिल सामंत, संहिता हिस्वनकर : अमराठी लोकांना शिवरायांच्या कार्याचे अद्वितीयत्व समजावे म्हणून एक हिंदी छोटेखानी पुस्तकमालिका.


**काळीज-गोंदण** : लेखक किरण लोखंडे : मनाल्या भिडणाऱ्या आत्मबंधांचा संग्रह

**इत्यर्थ** : संपादक : तन्वीर सिद्दिकी, सृजा, सुनिल सामंत. मराठी कथा, लघुनिबंध, नाट्यछटा, प्रवासवर्णन, चरित्रे आदी गद्य साहित्यासाठी एक नवं ई नियतकालिक. या वर्षात त्याचे सहा अंक निघाले.





**मुळांवरची माती सांभाळताना** : कवितासंग्रह : किरण भावसार : ग्रामीण जीवनातून शहराकडे जाताना होणारी एका कामगाराची घालमेल.


**मावळा १, व मावळा २**: लेखक : दामोदर मगदूम. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी साम्राज्याचा पाया म्हणजे जीवावर उदार होऊन समर्पण करणारे मावळे. या प्रत्येक मावळ्याची जीवन कथा.




**मायबोलीचा विश्वसेतू** : संकलक : दिवाकर कारखानिस, मोनाली फाटक, प्रमोद तेंडुलकर : उत्तर अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांच्या लेखणीचा एक साक्षात्कार.

**गंवसले दैवी कण** : लेखक : दामोदर मगदूम : हिग्स बोसॉन कणांच्या संशोधनाची गाथा.




**२६/११ चे अमर हुतात्मे** : लेखक : संजय वाघ : मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या १८ जवानांची कथा. प्रत्येक जवानाचे चरित्र.

**हिमालय अन्नपूर्णा ट्रेक** : लेखक : विनायक अंतुरकर : हिमालयातील खडतर २२ दिवसांच्या पायी प्रवासाचे वर्णन.

**सा.सू.** : लेखिका प्रियंका जोशी. पुण्यात पेइंगगेस्ट म्हणून गेलेल्या दोन विद्यार्थिनींचा एक धमाल अनुभव. आता याची सिरीज एका प्रमुख

वर्तमानपत्राच्या विशेष पुरवणीतून प्रसिद्ध होत आहे.


**धगधगते अग्नीकुंड** : स्वा. सावरकर चरित्र: लेखक श्री वा नेर्लेकर.

**काव्यार्थ** : कवी विजय पांढरे यांच्या कवितांचा संग्रह.

**भैरवगड थ रा र क** : लेखक : नचिकेत जोशी : एका १५०० फूट कातळकड्यावर चढण्याचा ( आणि उतरण्याचा) भन्नाट अनुभव.

**शो-पिस** : लघुकथा : लेखक : अरुण देशपांडे. मध्यमवर्गीय रिटायर्ड माणसाच्या रोजच्या जीवनावरचे भेदक भाष्य





या पाठोपाठ याहून एक से एक भारी पुस्तके घेऊन ई साहित्य प्रतिष्ठान येतच आहे.

आगामी पुस्तकांत आहेत

**वेरूळ** : (इतिहास आणि सौंदर्यशास्त्र) : लेखक डॉ प्रभाकर देव : छायाचित्रे : आनंद माने



माझे सिंगापुरायन : (विनोद) : लेखक : विशूभाऊ रणदिवे

गोरखगड ते सिद्धगड : (प्रवास) : लेखक : पंकज घारे

नागपुरी तडका (कविता) : गंगाधर मुटे

मराठी तमिळ शब्दकोश : रमाबाई जोशी

अध्यात्मांक (तत्त्वज्ञान): अनिल पाटील

गमत्या :(बालकादंबरी) अश्विनी शेटे

पियुच्या स्वप्नात : (बालकविता) : अरुण देशपांडे

मन तळयात मळयात (लघुकादंबरी) : अदिती कापडी

ई साहित्य प्रतिष्ठानचे आता जवळपास दिड लाख ई मेल सदस्य आहेत.

याशिवाय ई साहित्य प्रतिष्ठानच्या वेबसाईट्सचे वाचक वेगळेच. www.esahity.com च्या या आठवड्यात तीन लाख हिट्स पूर्ण झाल्या तर www.ednyaneshwari.com च्या पन्नास हजार. या शिवाय www.marathiriyasata.com ला तीस हजार हिट्स आहेत. या शिवाय ई साहित्यचे खालील ब्लॉग्स आणि पेजेस आहेत.

http://etyarth.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/p/blog-page.html

फेसबुकवर भेट द्या

https://www.facebook.com/esahity
https://www.facebook.com/groups/kaavya.marathi/
https://www.facebook.com/groups/gadyasansthan.esahity/
https://www.facebook.com/groups/kavyanjali.esahity/
https://www.facebook.com/groups/yadny/
https://www.facebook.com/groups/netaksharee/
https://www.facebook.com/edyaneshwari
https://www.facebook.com/balnetakshari

गेली पाच वर्षं ई साहित्याचा हा यज्ञ अव्याहत चालू आहे. आणि उत्तरोत्तर त्याला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. उदाहरणच द्यायचे तर वेबसाईट्सना मिळणाऱ्या हिट्सचे. पाच लाख हिट्सपैकी तीन लाख हिट्स गेल्या आठ महिन्यातील आहेत. म्हणजे गुरू ! ही तर आता आता सुरुवात आहे. पुढे खुपच मोठी धमाल आहे.

आमचा संकल्प आहे की बारा कोटी मराठी माणसांपैकी निदान एक टक्का लोकांपर्यंत पोचायचेच. म्हणजे प्रत्येक पुस्तक बारा लाख लोकांपर्यंत पोहोचलेच पाहिजे. हळू हळू केरळप्रमाणे प्रत्येक मराठी साक्षर माणूस एक वाचकही बनावा. माझ्या मायबोलीत ही शक्ती आहे. ज्ञानेश्वर माउलींची इच्छा म्हणून, शिवबाच्या या मराठीत पुन्हा एकदा वाचनाची संस्कृती जन्म घेते आहे. एका वेगळ्या स्वरूपात. एका नव्या अभियानात. एका नवीन विश्वाचे दरवाजे किलकिले झाले आहेत. आपण सर्वजण या जादूचे केवळ साक्षीदार नव्हे तर भागीदार बनूया. आपल्या ओळखीच्या लोकांचे फक्त बारा ई मेल आय डी आम्हाला पाठवा. आणि या भव्य यज्ञात भाग घ्या. आपण लेखक, कवी असाल तर आपले साहित्य पाठवा. आपल्या ओळखीच्या लेखक, कवींना या नव्या प्रयोगाबद्दल सांगा.

आणि काही वर्षांनंतर आपल्या नातवंडांना सांगा.... या जादूच्या प्रयोगात आम्हीही भागीदार होतो...

चला तर जादू करु या...

**आपल्या ओळखीच्या बारा लोकांचे मेल आय डी esahity@gmail.com ला कळवा.**

**खात्री बाळगा, या ई मेल्स चा वापर केवळ मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.**

धन्यवाद

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

## या पुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ चित्रकार किरण भावसार यांचे मित्र, चाहते श्री सुधीर बर्वे यांचे मनोगत

(एका परीने पाहिलं, तर आयुष्य म्हणजे आठवणींचा संचय.
काही स्मृति आपण आधीच्या जन्मातून घेऊन येतो,
तर काही पुढच्या जन्मासाठी घेऊन जातो।

ज्याला आपण 'मी' म्हणतो, तो तो अनेक बऱ्या-वाईट, बोचऱ्या तर कधी हळव्या अशा अनुभवांतून घडलेला असतो, आणि घडत असतो.
अनुभवाचा क्षण निघून गेला की उरते निव्वळ स्मृति!

शाळेत असताना गोळा केलेली गोळ्या चॉकलेट्ची वेष्टणे, शिंपले, गोट्या, मोरपीस किंवा पुस्तकात ठेवलेले रसरशीत पिंपळपान- पाण्याची लढाई हे सगळे विसरायला लावते.

आणि मग कधीतरी जुन्या ट्रंकेतून या वस्तू बाहेर निघतात पुस्तकांची धूळ झटकली जाते, आणि आत डोकावून पहावे तो काय, त्या पिंपळाच्या पानाला विलक्षण सुंदर अशी जाळी पडलेली असते!
क्षणार्धात मन मागे मागे धावतं आणि भूतकाळाची सैर करून येतं।
डोळे कोरडे करून नीट पाहिल्यावर लक्षात येतं, की हे नुसते पिंपळपान राहिलेले नाही, तर ते सोन्याचे झाले आहे - कारण त्याला आठवणींचा परिस स्पर्श झालाय..




किरण भावसार

7588833562

kiran@enzymeindia.com